**गावातील नागरिकांची एकजूट हेच गावाच्या विकासाचे सूत्र - जिल्हाधिकारी राजेश नार्वेकर**

**ग्रामीण भागातील कामांची जिल्हाधिकारी आणि मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी केली पाहणी***

ठाणे दि २० जून : गावातील नागरिकांची एकजूट असेल तर गावातील समस्यांचे निराकरण होऊन गावाचा विकास व्हायला वेळ लागत नाही. गावाच्या विकासाचे एकजूट हेच सूत्र असून कल्याण तालुक्यातील चवरे गावातील नागरिकांनी लोकसहभागाच्या माध्यमातून बांधलेला गाव तलाव यांचे उत्तम उदाहरण असल्याचे मत ठाणे जिल्ह्याचे जिल्हाधिकारी राजेश नार्वेकर यांनी व्यक्त केले. बुधवार १९ जून रोजी जिल्हाधिकारी आणि ठाणे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी हिरालाल सोनवणे यांनी एकत्रित जिल्ह्याचा दौरा करून ग्रामीण भागातील कामांची पाहणी केली.

जिल्ह्यात जलयुक्त शिवार आणि गाळ मुक्त धरण योजने अंतर्गत विविध ठिकाणी काम करण्यात आली असून मुरबाड आणि कल्याण तालुक्याची कामे यावेळी पाहण्यात आली. यामध्ये चवरे गावातील गाव तलाव , कोलम गावातील विहीर, दहीगाव शेलारी येथील महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना अंतर्गत रोपवाटिका, त्याच बरोबर मुरबाड येथील बांधीवली गावामध्ये सी.एस.आर अंतर्गत तलावातील काढण्यात आलेल्या गाळाची पाहणी करण्यात आली.

तसेच नारीवली येथील महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजने अंतर्गत वृक्षलागवड कामाची पाहणी करण्यात आली. शिवाय पेंढारी, वाघाची वाडी येथील देखील कामे पाहण्यात आली. यावेळी प्रांत अधिकारी, तहसीलदार तसेच सबंधित विभागाचे अधिकारी उपस्थित होते.




